# मिरा-भाईंदर ,वसई-विरार पोलीस आयुक्तालय
## सायबर गुन्हे शाखा

३ रा मजला, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), यांचे कार्यालय,
ओत्सवाल हाईट्सचे समोर, कनाकिया रोड, मिरारोड पुर्व, ता.जि.ठाणे
फोन नंबर – ०२२-२८११ ०१३५, व्हॉट्सॲप हेल्पलाईन क्र. ९०० ४८८ ०१३५
**Email ID – cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in**


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेस नोट :- ३२० दिनांक -१६/११/२०२१

**इन्स्टाग्राम या सोशल मिडीया प्लेटफॉर्मवर बनावट अकाऊंट बनवुन मुलीचे अश्लिल फोटो व्हायरल करणा-या दोन आरोपींना पकडण्यात सायबर गुन्हे शाखेस यश**

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत विरार पोलीस ठाणेचे हद्दीत राहणारी तकारदार मुलगी वय – २० वर्षे यांनी तिचे अश्लील फोटो सोशल मिडीयावर अनोळखी इस्टाग्राम अकाउंटव्दारे प्रसारीत केल्याबाबत सायबर गुन्हे शाखेत दिनांक २८/१०/२०२१ रोजी तक्रार दिली होती. सदर तक्रारी अर्जाची चौकशी सायबर गुन्हे शाखे्कडून माहीतीच्या आधारे दोन संशयित नामे १) ललीत कन्हैयालाल सोळंकी वय – १९ वर्षे रा. गोपचरपाडा विरार पु. २) आकाश किरण सोलंकी वय-१९ वर्ष,रा.ए.वींग/००४, रचना पार्क, विराटनगर, विरार प यांना ताब्यात घेवुन त्यांचेकडे कसून चौकशी केली असता त्यांनी सदर प्रकार केल्याचे निष्पन्न झालेले आहे. तसेच त्यांचे मोबाईलचे विश्लेषण केले असता त्यामध्ये इन्स्टाग्राम अकाउंट मिळून आले आहे.

नमुद महीला तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीवरुन विरार पोलीस ठाणे येथे गुन्हा रजिस्टर नंबर १०९७/२०२१ भा.दं.वि.सं. कायदा कलम ३५४ सह माहिती तंत्रज्ञात अधिनीयम कलम ६७ अन्वये दिनांक १६/११/२०२१ रोजी ०१.१६ वाजता गुन्हा नोंद करण्यात आला असुन वरील दोन आरोपी यांना अटक करण्यात आली असुन विरार पोलीस ठाणे येथे पुढील तपास सुरु आहे.

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे इन्टाग्राम अथवा कोणत्याही सोशल मिडीयावर अश्लिल फोटोस व्हायरल/प्रसारीत करणे कायदयाने गुन्हा आहे. आपणांस असे कृत्य कोणी करीत असल्याचे आढळुन आल्यास तात्काळ नजिकच्या पोलीस ठाण्यात अथवा सायबर गुन्हे शाखेस संपर्क साधावा.**

सदरची कामगिरी डॉ.श्री.महेश पाटील,पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री.अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.सुजितकुमार गुंजकर, पोउपनिरी संतोष भिसे, पोउपनिरी/प्रसाद शेनोळकर,पोशि/२०७२ इलग,पोशि/१८१२ प्रविण आव्हाड, मपोशि/ पल्लवी निकम, मपोशि/माधुरी धिंडे यांनी पार पाडली आहे.

- सायबर गुन्हे शाखा संपर्क क्रमांक :- 022-2811 0135
- सायबर गुन्हे शाखा व्हॉट्सॲप हेल्पलाईन क्रमांक :- 900 488 0135
- सायबर गुन्हे शाखा ई-मेल आयडी :- **cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in**

-----